**पाहिजेत**

ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त

स्थापना- 1986

**पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा**

Email : patilinstitutesatara@gmail.com

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश

सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी

* इलेक्ट्रिकल सुपरवायझर * ऑटोमोबाईल टेक्निशियन
* इलेक्ट्रिकल वायरमन * मोटार वायडिंग
* टू-व्हीलर मेकॅनिक * फोर व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक * वेल्डर / प्लंबर
* कॉम्प्युटर ऑपरेटर * कॉम्प्युटर हार्डवेअर

एस. टी. पास, लायसन्स व प्लेसमेंटची सोय

प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.

प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ४८ वा | शनिवार, दि. ०५ सप्टेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# ‘विकसित भारत’चा नारा अन जनतेला काटकसरीचा मारा !

## विकासाच्या दाव्यांमध्ये काटकसरीचा सल्ला; मोदींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याचे लक्ष्य समोर ठेवताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील नागरिकांना पुन्हा एकदा काटकसर आणि बचतीचा सल्ला दिला आहे. अनावश्यक खर्च टाळावा, सोने खरेदीचा मोह आवरावा, परदेश प्रवास तसेच परदेशात होणारे महागडे विवाह सोहळे टाळावेत, असे आवाहन त्यांनी केले आहे. मात्र, एका बाजूला देशाची अर्थव्यवस्था ७.८ टक्के दराने वाढत असल्याचे सांगत भारतीयांचे अभिनंदन करायचे आणि दुसऱ्या बाजूला नागरिकांना खर्च कमी करण्याचा सल्ला द्यायचा, या भूमिकेतील विरोधाभासावर आर्थिक क्षेत्रातून प्रश्न उपस्थित होत आहेत.

यापूर्वी अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष तीव्र झाल्यानंतर निर्माण झालेल्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवरही पंतप्रधान मोदी यांनी भारतीयांना बचत आणि काटकसरीचा सल्ला दिला होता. त्या वेळी जागतिक परिस्थिती, इंधनाचे दर आणि परकीय चलनावरील संभाव्य दबाव लक्षात घेता हा सल्ला काही प्रमाणात समजण्यासारखा होता. मात्र, यावेळी देशाची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असल्याचा दावा होत असताना पुन्हा काटकसरीचा आग्रह का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### विकासाचा वेग चांगला, मग काटकसर कशासाठी ?

कोरोना महामारीनंतर जगातील अनेक अर्थव्यवस्थांना मोठा धक्का बसला. पुरवठा साखळी विस्कळीत झाली, महागाई वाढली आणि अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर मंदीचे सावट आले. या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्थेने चांगली कामगिरी केली असल्याचा केंद्र सरकारचा दावा आहे. देशाचा आर्थिक विकासदर ७.८ टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे सांगत पंतप्रधानांनी या कामगिरीचे श्रेय देशातील नागरिकांच्या परिश्रमाला दिले आहे.

जीएसटी आणि प्राप्तिकराच्या माध्यमातून सरकारच्या महसुलात वाढ होत असल्याचेही सातत्याने सांगितले जात आहे. औद्योगिक उत्पादन, सेवा क्षेत्र आणि विविध आर्थिक व्यवहारांमध्येही वाढ झाल्याचे चित्र मांडले जाते. असे असेल तर अर्थव्यवस्थेतील सर्वसामान्य ग्राहकांचा खर्च कमी करण्याचा सल्ला देण्यामागे नेमका आर्थिक तर्क काय, यावर चर्चा होणे आवश्यक आहे.

### बाजारपेठेला ग्राहकांच्या खर्चाची गरज

आधुनिक अर्थव्यवस्था ही मोठ्या प्रमाणात मागणी आणि पुरवठ्याच्या चक्रावर आधारित आहे. नागरिक वस्तू आणि सेवांवर जितका खर्च करतात, तितकी बाजारपेठेतील उलाढाल वाढते. त्यातून उत्पादनाला चालना मिळते, उद्योगांना मागणी निर्माण होते, रोजगाराच्या संधी वाढतात आणि सरकारलाही कराच्या माध्यमातून महसूल मिळतो.

सोने खरेदी असो, पर्यटन असो किंवा विवाह समारंभ; नागरिकांकडून होणारा प्रत्येक खर्च अर्थव्यवस्थेतील एखाद्या घटकासाठी उत्पन्न निर्माण करतो. त्यामुळे नागरिकांनी खर्चच कमी करावा, असा व्यापक संदेश दिल्यास त्याचा देशांतर्गत मागणीवर परिणाम होऊ शकतो. आर्थिक विकासाचा वेग कायम ठेवण्यासाठी उपभोग आणि गुंतवणूक या दोन्हींचे महत्त्व लक्षात घेणे आवश्यक आहे.

### परकीय चलन व सोन्याच्या आयातीचा मुद्दा

पंतप्रधानांच्या आवाहनामागे परकीय चलनाच्या गंगाजळीवरील दबावाचा मुद्दा असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भारतात सोन्याला मोठी मागणी आहे. देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सोने आयात करावे लागते. त्यामुळे सोन्याच्या आयातीसाठी मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्च होते.

त्याचप्रमाणे भारतीय नागरिक परदेशात पर्यटनासाठी किंवा विवाह समारंभासाठी मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करतात तेव्हा त्या खर्चाचा थेट फायदा संबंधित देशांच्या अर्थव्यवस्थेला होतो. परदेशात जाणाऱ्या भारतीयांकडून होणारा खर्च म्हणजे देशाबाहेर जाणारा पैसा. त्यामुळे अनावश्यक परदेश प्रवास आणि परदेशातील महागडे विवाह सोहळे टाळण्याचे आवाहन करण्यामागे परकीय चलनाची बचत हा उद्देश असू शकतो.

मात्र, नागरिकांना काटकसर करण्याचा सल्ला देण्याऐवजी देशांतर्गत पर्यटन, उत्पादन आणि सेवा क्षेत्राला अधिक चालना देणारी धोरणे राबविणे हा त्याहून परिणामकारक मार्ग ठरू शकतो.

### सोन्याकडे गुंतवणुकीचा पर्याय म्हणून वाढता कल

भारतीय समाजात सोन्याला केवळ दागिना म्हणून नव्हे, तर पारंपरिक गुंतवणूक म्हणूनही मोठे महत्त्व आहे. सणासुदीच्या काळात तसेच विवाहाच्या हंगामात सोने खरेदीला विशेष मागणी असते. शेअर बाजारातील अस्थिरता आणि गुंतवणुकीतील अनिश्चितता वाढली की अनेक नागरिक सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याकडे वळतात.




### जीडीपी वाढ 7.8% नव्हे तर 2.6%
### माजी वित्त सचिव सुभाष गर्ग यांचा दावा

भारताच्या एप्रिल-जून तिमाहीतील GDP वाढीचा दर 7.8% राहिला आहे. हा आकडा RBIच्या 7% अंदाजापेक्षा जास्त आहे. मात्र, माजी वित्त सचिव सुभाष चंद्र गर्ग यांनी या आकडेवारीवरच प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांच्या मते, काही वेगळ्या पद्धतीने आकडे पाहिल्यास GDP वाढ 2.6% असल्याचे दिसते. गर्ग यांच्या मते, एप्रिल-जून 2026 या तिमाहीत भारताची GDP वाढ सरकारने सांगितल्याप्रमाणे 7.8% नसून प्रत्यक्षात सुमारे 2.6% आहे.

सुभाष चंद्र गर्ग म्हणाले की, सरकारने एप्रिल-जून तिमाहीसाठी जाहीर केलेली 7.8 टक्के GDP वाढ ही आकडेवारी पाहताना सावध राहण्याची गरज आहे. माझ्या गणनेनुसार, 2025-26 च्या एप्रिल-जून तिमाहीत GDP 86.05 लाख कोटी रुपये होता, तर 2026-27 च्या याच तिमाहीत तो 88.27 लाख कोटी रुपये आहे. या दोन आकड्यांमध्ये झालेली वाढ पाहिली तर ती केवळ 2.6 टक्क्यांच्या आसपास आहे.

गर्ग यांनी पुढे म्हटले की, GDP मोजण्याची नवीन मालिका लागू करण्यात आली असून त्यासाठी आधारभूत वर्ष (Base Year ) देखील बदलण्यात आले आहे. त्यामुळे जुन्या मालिकेतील आकडे आणि नव्या मालिकेतील आकडे यांची तुलना करताना विशेष काळजी घेण्याची गरज आहे. केवळ नवीन मालिकेतील आकडे वापरून 7.8 टक्के वाढ दाखवली जात असल्यास, अर्थव्यवस्थेची प्रत्यक्ष वाढ किती आहे, हा प्रश्न उपस्थित होतो.

त्यांच्या मते, GDP वाढीचा आकडा समजून घेताना केवळ सरकारने जाहीर केलेल्या टक्केवारीकडे न पाहता, त्या आकड्यामागील गणित, आधारभूत वर्ष आणि GDP मोजण्याची पद्धतही पाहणे आवश्यक आहे.

थोडक्यात, गर्ग यांचा दावा असा आहे की 7.8% GDP वाढ ही अर्थव्यवस्थेच्या प्रत्यक्ष वाढीचे योग्य चित्र दाखवत नाही; त्यांच्या गणनेनुसार वास्तविक वाढ सुमारे 2.6% आहे.

त्यामुळे केवळ सोने खरेदी करू नका, असे सांगणे व्यवहार्य ठरेलच असे नाही. त्याऐवजी देशांतर्गत उत्पादन वाढवणे, सोन्याच्या पुनर्वापराला चालना देणे, पर्यायी गुंतवणूक साधनांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि आयात अवलंबित्व कमी करण्यासाठी दीर्घकालीन धोरण आखणे आवश्यक ठरते.

### परदेशातील विवाहांची वाढती क्रेझ

देशातील मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय नागरिकांचे उत्पन्न वाढत असल्याने विवाह सोहळ्यांवरील खर्चही वाढत आहे. विशेषतः परदेशातील पर्यटनस्थळांवर विवाह करण्याची क्रेझ वाढताना दिसत आहे. अशा विवाहांवर होणारा खर्च मोठ्या प्रमाणावर देशाबाहेर जातो. त्यामुळे पंतप्रधानांनी अशा खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे आवाहन केले आहे.

मात्र, केवळ नागरिकांना उपदेश करून ही प्रवृत्ती थांबवणे कितपत शक्य आहे, हा प्रश्न आहे. देशांतर्गत पर्यटनस्थळे विकसित करून त्यांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्यास मोठ्या प्रमाणावर होणारा खर्च देशातच ठेवता येऊ शकतो. त्यातून स्थानिक उद्योग, हॉटेल व्यवसाय, वाहतूक, पर्यटन आणि रोजगाराला मोठी चालना मिळू शकते.

### काटकसरीपेक्षा उत्पादनक्षमतेवर भर हवा

भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवायचे असेल तर केवळ नागरिकांनी खर्च कमी करणे हा विकासाचा मार्ग असू शकत नाही. त्यासाठी अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता वाढवणे, औद्योगिकीकरणाचा वेग वाढवणे, सेवा क्षेत्राचा विस्तार करणे, रोजगारनिर्मितीला चालना देणे आणि निर्यात वाढवणे आवश्यक आहे.

देशाची आयात आणि निर्यात यातील तफावत कमी करणे, भारतीय उत्पादनांना जागतिक बाजारपेठ मिळवून देणे आणि उच्च मूल्यवर्धित उत्पादनांमध्ये भारताचा वाटा वाढवणे, या दिशेने व्यापक प्रयत्न करण्याची गरज आहे.

### योजनांची प्रभावी अंमलबजावणी महत्त्वाची

केंद्र सरकारने गेल्या काही वर्षांत ‘स्टार्टअप इंडिया’, ‘स्टँड अप इंडिया’, ‘मेक इन इंडिया’, ‘स्किल इंडिया’ यांसारख्या विविध योजनांची घोषणा केली. या योजनांचा मूळ उद्देश उद्योग, कौशल्य, रोजगार आणि उद्योजकतेला चालना देणे हा आहे.

या योजनांची प्रभावी आणि सर्वसमावेशक अंमलबजावणी झाली, तर नागरिकांना काटकसरीचा सल्ला देण्यापेक्षा त्यांच्या उत्पन्नाची क्षमता वाढविणे अधिक परिणामकारक ठरू शकते. नागरिकांचे उत्पन्न वाढले, रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आणि उत्पादन व सेवा क्षेत्र विस्तारले, तर देशांतर्गत मागणीही वाढेल आणि अर्थव्यवस्थेला अधिक मजबूत आधार मिळेल.

### ‘काटकसर’ नव्हे, उत्पन्नवाढीचा मार्ग दाखवा

देशाला विकसित राष्ट्र बनविण्यासाठी नागरिकांच्या खर्चावर मर्यादा आणण्यापेक्षा त्यांच्या उत्पन्नात वाढ कशी होईल, याचा विचार अधिक महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागातील रोजगार, शेतीमालाला योग्य बाजारपेठ, लघु आणि मध्यम उद्योगांना भांडवल, तरुणांना कौशल्य आणि रोजगार, तसेच उद्योगांना अनुकूल वातावरण यावर अधिक भर देणे गरजेचे आहे.

नागरिकांनी काटकसर करावी, हा संदेश आर्थिक संकटाच्या काळात उपयुक्त ठरू शकतो. मात्र, अर्थव्यवस्था वेगाने वाढत असल्याचा दावा केला जात असताना त्याचवेळी खर्च कमी करण्याचा सल्ला दिल्यास सरकारच्या आर्थिक धोरणांबाबत सामान्य नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

### विकास आणि काटकसर यातील विरोधाभास दूर करण्याची गरज

भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याचे उद्दिष्ट निश्चितच महत्त्वाकांक्षी आहे. मात्र, हे लक्ष्य साध्य करण्यासाठी नागरिकांनी काय खरेदी करू नये, कुठे प्रवास करू नये किंवा विवाह कुठे करू नये, यापेक्षा देशाची अर्थव्यवस्था अधिक उत्पादनक्षम, स्पर्धात्मक आणि रोजगारक्षम कशी बनेल, यावर भर असणे आवश्यक आहे.

विकासाचा वेग वाढत असल्याचे सांगताना त्याचवेळी जनतेला काटकसरीचा उपदेश देण्यापेक्षा नागरिकांचे उत्पन्न वाढविणे, उद्योगांना बळ देणे, निर्यात वाढविणे, आयात अवलंबित्व कमी करणे आणि रोजगारनिर्मितीला चालना देणे या मूलभूत उपायांवर केंद्र सरकारने अधिक गांभीर्याने लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

‘विकसित भारताचे स्वप्न नागरिकांच्या खर्चाला लगाम घालून नव्हे, तर त्यांच्या उत्पन्नाला आणि देशाच्या उत्पादनक्षमतेला वेग देऊन साकार होऊ शकते. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकास आणि काटकसर या विरोधाभासातून बाहेर पडून ठोस आर्थिक उद्दिष्टांवर आधारित दीर्घकालीन धोरणाला प्राधान्य देण्याची गरज आहे.

# मराठा आंदोलनात GEN Z ची एन्ट्री !

## शाळकरी मुलींच्या घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय दणाणले

### सरकारला गंभीर इशारा !



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसलेले संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ सोलापूर जिल्हा सकल मराठा समाजाच्या वतीने गुरुवारी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने शाळकरी मुली आणि GEN Z विद्यार्थिनी आंदोलनात सहभागी झाल्या, ही बाब विशेष चर्चेचा विषय ठरली.

विद्यार्थिनींनी दिलेल्या जोरदार घोषणांमुळे जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर दणाणून गेला. सोलापूरच्या मराठा समाजाच्या आंदोलनात GEN Z पिढीतील विद्यार्थ्यांचा प्रथमच एवढ्या थेट स्वरूपात झालेला सहभाग लक्षणीय ठरल्याचे आंदोलकांनी सांगितले.

मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावे, हैदराबाद गॅझेटनुसार शासनाने काढलेल्या जीआरची अंमलबजावणी करून कुणबी दाखले देण्यात यावेत, सारथी संस्थेच्या बंद करण्यात आलेल्या विविध योजना तातडीने सुरू कराव्यात तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला पुरेसा निधी देऊन मराठा तरुणांसाठी उद्योग-व्यवसायाकरिता आर्थिक मदत सुरळीत करावी, अशा विविध मागण्यांसाठी उपोषण करत आहेत.

या मागण्यांची शासनाने तातडीने दखल घ्यावी आणि मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडविण्यासाठी सकारात्मक पावले उचलावीत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

‘जरांगे पाटील यांच्या प्रकृतीला काही धोका निर्माण झाल्यास मराठा समाज अधिक तीव्र आंदोलन करेल,’ असा इशाराही सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आला. शासनाच्या भूमिकेमुळे मराठा समाजामध्ये अस्वस्थता आणि नाराजी वाढत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी यापूर्वीही अनेक आंदोलने झाली आहेत. मात्र, यावेळी शाळकरी मुलींसह GEN Z विद्यार्थ्यांचा आंदोलनातील थेट सहभाग हा विशेष ठरला. त्यांच्या घोषणांनी आंदोलनाला वेगळे स्वरूप प्राप्त झाले.

शासनाने मराठा समाजाच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देतेवेळी प्रत्यक्ष मुलींचा सहभाग होता,त्यांच्यासोबत सकल मराठा समाजाचे माऊली पवार, ज्ञानेश्वर सपाटे,शिवाजी चापले, शिवाजी भोसले, मारुती सावंत, सुनील शेळके, दिनेश डोंगरे, सचिन तिकटे, अशोक भोसले, चंद्रकांत पात्रे, तानाजी माने, राहुल मन्नापुरे, रोहन हावळे, किरण देशमुख, सुरेश जगताप, जनार्दन चव्हाण आदी उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांची संवेदनशीलता

शाळकरी मुलींनी निवेदन दिल्यानंतर स्वतः जिल्हाधिकारी उठून उभे राहिले. त्यांनी उपस्थित मुलींची संवाद साधून मी जिल्हाधिकारी या नात्याने तुम्हाला आणखी काय मदत करू शकतो हे आवर्जून सांगा असे सांगितले. त्याचवेळी मुलींना भविष्यात तुम्हाला काय बनायला आवडेल..! तुमची स्वप्न काय यावर विचारणा केली.तेव्हा उपस्थित मुलींनी मला खाकी वर्दी घालायला आवडेल, तर काहींनी नौदलात, आर्मी मध्ये, डॉक्टर, होण्याची इच्छा असल्याचे जिल्हाधिकारी यांना सांगितले. जिल्हाधिकाऱ्यांनी आनंदामध्ये सर्व शाळकरी मुलींची संवाद साधल्याने उपस्थितांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

# मनोज जरांगेंच्या समर्थनार्थ मंगळवेढा कडकडीत बंद




**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आंतरवलीतील आमरण उपोषणावर अद्याप तोडगा न निघाल्यामुळे संतप्त झालेल्या मंगळवेढा येथील सकल मराठा समाजातील बांधवांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत मंगळवेढा शहर पूर्ण कडकडीत बंद ठेवण्यात आले आहे शहरातील आर्थिक व्यवहार बंद आहेत.

परवा दिवशी सायंकाळी सहा ते आठ या दरम्यान शहरातील दामाजी चौकात ठिय्या मांडला त्यामुळे वाहतूक व्यवस्था तब्बल दोन तास विस्कळीत झाली. त्याचवेळी यावर तोडगा न निघाल्यास मंगळवेढा बंदचा इशारा दिला होता. मराठा समाजाच्या आरक्षण प्रश्नावर आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी ज्या ज्या वेळेला आंदोलन उभा केले. त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये मंगळवेढ्यातील मराठा बांधव मोठ्या संख्येने सहभाग होऊन आंदोलनामध्ये सहभाग नोंदवत लढ्याची तीव्रता वाढवली 29 ऑगस्ट पासून याच प्रश्नावर त्यांचे आमरण उपोषण सुरू आहे.

मात्र अद्याप त्यावर तोडगा निघालेला नाही यावेळी सकल मराठा समाजाच्या बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शहरांमधून फेरफटका मारत मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ एक मराठा लाख मराठा,संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है,आरक्षण आमच्या हक्काच नाही कुणाच्या बापाच एक मराठा लाख मराठा अश्या जोरदार घोषणा देण्यात आल्या. दरम्यान शहरातील व्यापाऱ्यांनी या आरक्षणाच्या लढ्याच्या समर्थनार्थ मंगळवेढा बंदचे आवाहनाला प्रतिसाद दिला. शहरातील वैद्यकीय सुविधा वगळता इतर सर्व सुविधा बंद ठेवण्यात आलेल्या आहेत शहरातील प्रमुख रस्त्यावर शुकशुकाट दिसत आहे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाकडे शासनाने गांभीर्याने पाहून मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीवर तातडीने निर्णय घ्यावा,अशी मागणी यावेळी करण्यात आली. मंगळवेढ्याबरोबर ग्रामीण भागात बोराळे, मरवडे, खोमनाळ, भाळवणी, भोसे, सरगर बुद्रुक, आंधळगाव, पटकन, डोंगरगाव, ढवळस, ब्रह्मपुरी, मारापुर,घरनिकी,फटेवाडी भालेवाडी, रहाटेवाडी या गावातून देखील या आरक्षणाच्या लढ्याला समर्थन मिळत आहे.

# मतदारांनी नावे तपासून दावे-हरकती नोंदविण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत 249-सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी दि. 31 ऑगस्ट 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. पात्र मतदारांनी आपले तसेच कुटुंबातील सदस्यांचे नाव मतदार यादीत आहे किंवा नाही, याची तपासणी करून आवश्यक असल्यास दावे व हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्रमांक 1 यांच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रारूप मतदार यादी मतदारांच्या माहितीसाठी व तपासणीसाठी सर्व संबंधित मतदान केंद्रे, तहसील कार्यालय, सोलापूर येथील निवडणूक शाखा, तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मतदारांनी प्रारूप यादीमध्ये आपले नाव, पत्ता, वय, लिंग, मतदार ओळखपत्र क्रमांक (EPIC) तसेच मतदान केंद्राची माहिती तपासावी. नावामध्ये काही त्रुटी असल्यास किंवा नाव समाविष्ट नसल्यास विहित नमुन्यात अर्ज करून दुरुस्ती अथवा नाव समाविष्ट करण्याची कार्यवाही करता येणार आहे.

### दावे व हरकतींसाठी 30 सप्टेंबरपर्यंत मुदत

प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर दि. 31 ऑगस्ट ते 30 सप्टेंबर 2026 या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार आहेत. संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO), सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) तसेच तहसील कार्यालयातील निवडणूक शाखेत अर्ज सादर करता येतील.

### विविध अर्जांसाठी नमुना 6, 7 व 8

नमुना क्र. 6 (Form 6) : नव्याने मतदार नोंदणी करण्यासाठी. दि. 1 ऑक्टोबर 2026 रोजी किंवा त्यापूर्वी वयाची 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांसाठी हा अर्ज करता येईल.

**नमुना क्र. 7** (Form 7) : मतदार यादीतील चुकीची अथवा मृत/स्थलांतरित व्यक्तीची नोंद वगळण्यासाठी किंवा नाव वगळण्याबाबत हरकत नोंदविण्यासाठी.

**नमुना क्र. 8** (Form 8) : मतदार यादीतील दुरुस्ती, जन्मतारीख/वय, लिंग, नातेसंबंध, पत्ता बदल, अपंगत्वाची नोंद किंवा नवीन ई-एपिक (E-EPIC)/नवीन मतदार ओळखपत्रासाठी.

नागरिकांना Voter Services Portal (voters.eci.gov.in) व Voter Helpline App द्वारेही ऑनलाइन अर्ज व आवश्यक कार्यवाही करता येणार आहे. महाराष्ट्रातील प्रारूप मतदार याद्यांसाठी अधिकृत निवडणूक विभागाची माहितीही उपलब्ध आहे.

मतदारांनी मतदानाचा हक्क अबाधित राहण्यासाठी प्रारूप मतदार यादीत आपले नाव तपासून, आवश्यक असल्यास दि. 30 सप्टेंबर 2026 पूर्वी दावे अथवा हरकती नोंदवाव्यात. तसेच लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने या पुनरीक्षण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्रमांक 1 यांनी केले आहे.

# गणेशोत्सव मिरवणुकीत डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटला बंदी

## जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचे आदेश




**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** गणेशोत्सवाच्या काळात सार्वजनिक गणेश मंडळांच्या मिरवणुकांमध्ये डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटचा वापर केल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास आणि सुरक्षिततेस धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन, सोलापूर जिल्ह्यात 13 ते 26 सप्टेंबर, 2026 या कालावधीत गणेशमूर्ती आगमन व विसर्जन मिरवणुकींमध्ये डॉल्बी सिस्टीम आणि लेझर लाईट शोच्या वापरास प्रतिबंध करण्यात आला आहे. जिल्हादंडाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 मधील कलम 163(1) अन्वये याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

सोलापूर जिल्ह्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. सार्वजनिक गणेश मंडळांकडून गणेशमूर्ती आगमन तसेच विसर्जनावेळी मोठ्या प्रमाणात मिरवणुका काढल्या जातात. या मिरवणुकांमध्ये डॉल्बी सिस्टीम आणि लेझर लाईटचा मोठ्या प्रमाणात वापर होण्याची शक्यता असते.

डॉल्बी सिस्टीमच्या वापरामुळे मिरवणुकीत उपस्थित असलेल्या काही व्यक्तींना कानाचा व छातीचा त्रास होऊन कायमस्वरूपी अपंगत्व अथवा जीवितास धोका निर्माण झाल्याच्या घटना पूर्वी निदर्शनास आल्या आहेत. तसेच, लेझर लाईट थेट डोळ्यांवर पडल्यामुळे विशेषतः लहान मुले आणि वयोवृद्धांच्या डोळ्यांच्या पडद्याला व बुबुळाला इजा झाल्याच्या घटनाही घडल्या असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

गणेशमूर्ती आगमन आणि विसर्जन मिरवणुकांदरम्यान अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊन नागरिकांच्या आरोग्याला अथवा जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने, डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटच्या वापरावर प्रतिबंध घालणे आवश्यक असल्याचे जिल्हादंडाधिकाऱ्यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 मधील कलम 163 (1) नुसार मानवी जीवित, आरोग्य किंवा सुरक्षिततेला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यास तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे अधिकार जिल्हादंडाधिकाऱ्यांना आहेत. त्यानुसार 13 सप्टेंबर ते 26 सप्टेंबर 2026 या कालावधीत सोलापूर जिल्ह्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून स्थापना व विसर्जनाच्या दिवशी आयोजित मिरवणुकांमध्ये डॉल्बी सिस्टीम आणि लेझर लाईट शोचा वापर करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर फौजदारी कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हादंडाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

## संपादकीय

# तरीही शेतकरी तहानलेलाच का?

महाराष्ट्राच्या जलसंधारण आणि सिंचन क्षेत्राबाबत सरकारकडून सातत्याने मोठ्या प्रमाणावर कामे, खर्च आणि जलसमृद्धीची आकडेवारी मांडली जाते. ही आकडेवारी महत्त्वाची असली, तरी तिचे मूल्यमापन केवळ पूर्ण झालेल्या कामांच्या संख्येवर किंवा खर्च झालेल्या निधीवर होऊ शकत नाही. या योजनांमुळे प्रत्यक्षात किती सिंचनक्षमता निर्माण झाली, किती क्षेत्राला पाणी मिळाले, भूजलपातळीत किती सुधारणा झाली आणि या कामांचा लाभ किती शेतकऱ्यांना दीर्घकाळ मिळाला, हे अधिक महत्त्वाचे प्रश्न आहेत. जलसंधारणमंत्री संजय राठोड यांनी 'लोकसत्ता'मध्ये लिहिलेल्या 'ग्रामीण अर्थव्यवस्थेला जलसंधारणाची संजीवनी' या लेखात हजारो गावे, लाखो कामे आणि हजारो कोटी रुपयांच्या खर्चाची आकडेवारी मांडली आहे. या प्रयत्नांचे स्वागत करतानाच, त्या आकडेवारीच्या पलीकडे जाऊन काही मूलभूत प्रश्न विचारणे आवश्यक आहे. शेतकऱ्याच्या शेतात प्रत्यक्ष पाणी पोहोचले आहे का? सिंचन प्रकल्पांची अपेक्षित क्षमता निर्माण झाली आहे का? भूजलपातळीत शाश्वत सुधारणा झाली आहे का? आणि एवढ्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या कामांची देखरेख करण्यासाठी शासनाकडे पुरेसे मनुष्यबळ आहे का? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय 'जलसमृद्ध महाराष्ट्रा'चे चित्र पूर्ण होऊ शकत नाही.

### मनुष्यबळाचा प्रश्न

जलसंधारण आणि सिंचन प्रकल्पांचे यश केवळ निधी, निविदा किंवा कामांची संख्या यावर अवलंबून नसते. सक्षम अभियंते, तांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि प्रशासकीय यंत्रणा ही त्याची पूर्वअट आहे.

जलसंधारणाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याची खरी परीक्षा सुरू होते. बंधारे, तलाव, नाले, जलसाठे आणि इतर संरचनांची नियमित देखभाल, गाळाचे व्यवस्थापन, संरचनांची तांत्रिक तपासणी, पाणीसाठ्याचे निरीक्षण आणि कामाच्या गुणवत्तेचे परीक्षण सातत्याने करावे लागते. मात्र संबंधित विभागातील महत्त्वाची पदे दीर्घकाळ रिक्त असतील, तर एवढ्या मोठ्या प्रमाणातील कामांवर प्रभावी देखरेख कशी होणार? गुणवत्ता नियंत्रण कोण करणार? खर्चावर नियंत्रण कोण ठेवणार? काम पूर्ण झाल्यानंतर त्याचा प्रत्यक्ष परिणाम कोण तपासणार?

हा केवळ प्रशासकीय प्रश्न नाही. मनुष्यबळाचा अभाव हा सार्वजनिक निधीच्या परिणामकारक वापराशी आणि प्रकल्पांच्या गुणवत्तेशी थेट संबंधित प्रश्न आहे. शासनाने हजारो कोटी रुपये खर्च करण्याचे उद्दिष्ट ठेवले असेल, तर त्या निधीचे नियोजन, अंमलबजावणी, देखरेख आणि मूल्यांकन करणारी यंत्रणाही त्याच प्रमाणात सक्षम असली पाहिजे.

### रखडलेले सिंचन प्रकल्प

महाराष्ट्रात विविध कारणांमुळे अनेक सिंचन प्रकल्प वर्षानुवर्षे रखडले आहेत. भूसंपादन, वनमंजुरी, पुनर्वसन, प्रशासकीय मंजुरी आणि इतर प्रक्रियांमुळे प्रकल्पांचा कालावधी वाढतो, त्याचबरोबर प्रकल्पांच्या किमतीही मोठी वाढ होते. एकेकाळी शेकडो कोटी रुपयांत पूर्ण होण्याची अपेक्षा असलेले प्रकल्प हजारो कोटी रुपयांपर्यंत पोहोचतात. मात्र खर्चातील ही वाढ आणि प्रत्यक्ष निर्माण झालेली सिंचनक्षमता यांचा ताळमेळ कितपत आहे, हा प्रश्न उपस्थित होतो.

शेतकऱ्याच्या दृष्टीने गणित अत्यंत साधे आहे. धरणासाठी किती कोटी रुपये खर्च झाले, यापेक्षा त्या धरणातून माझ्या शेतात किती पाणी आले, हे त्याच्यासाठी अधिक महत्त्वाचे आहे. प्रकल्प रखडला की केवळ सरकारी निधी अडकत नाही; शेतकऱ्याचे भवितव्यही अनिश्चिततेत अडकते. त्याचे पीक पावसावर अवलंबून राहते, उत्पन्नाची हमी कमी होते आणि कर्जबाजारीपणाचा धोका वाढतो. त्यामुळे रखडलेले सिंचन प्रकल्प हा केवळ अभियांत्रिकी किंवा प्रशासकीय विषय नाही. तो ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि सामाजिक न्यायाशी संबंधित प्रश्न आहे.

### जलयुक्त शिवार

जलयुक्त शिवार आणि जलसंधारणाच्या इतर योजनांमुळे अनेक ठिकाणी स्थानिक पातळीवर कामे झाली आहेत. मात्र कोणत्याही योजनेचे मूल्यांकन केवळ किती कामे झाली किंवा किती निधी खर्च झाला यावर होऊ नये. खरा प्रश्न असा आहे की या कामांमुळे पाणीसाठा किती वाढला? भूजलपातळीत किती सुधारणा झाली? सिंचनाखालील क्षेत्र किती वाढले? आणि हा परिणाम किती काळ टिकला?

जलसंधारणाच्या कामांबाबत गुणवत्ता किंवा अनियमिततेच्या तक्रारी असतील, तर त्यांची स्वतंत्र आणि पारदर्शक तपासणी झाली पाहिजे. कागदोपत्री काम पूर्ण होणे आणि त्या कामाचा प्रत्यक्ष, दीर्घकालीन परिणाम दिसणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. शेतकरी सरकारी अहवालातील 'काम पूर्ण' हा शब्द पाहत नाही; तो आपल्या विहिरीतील पाण्याची पातळी पाहतो. तो अहवालातील जलसाठा पाहत नाही; तो आपल्या शेतातील ओलावा पाहतो. म्हणूनच जलसंधारणाच्या योजनांचे मूल्यांकन 'आउटकम'च्या आधारे करणे आवश्यक आहे.

### 'जलसमृद्ध गाव' म्हणजे नेमके काय?

हजारो गावे जलसमृद्ध झाल्याचा दावा केला जात असेल, तर 'जलसमृद्ध' या संकल्पनेची स्पष्ट आणि मोजता येणारी व्याख्या असणे गरजेचे आहे. एखादा बंधारा बांधला म्हणून गाव जलसमृद्ध झाले का? एखादा नाला खोदला म्हणून सिंचन वाढले का? की भूजलपातळी, सिंचनाखालील क्षेत्र, पिकांची उत्पादकता आणि शेतकर्यांचे उत्पन्न यामध्ये दीर्घकालीन सुधारणा झाली तरच एखादे गाव जलसमृद्ध मानायचे? सरकारकडे या प्रश्नांची गावनिहाय आणि जिल्हानिहाय आकडेवारी असेल, तर ती सर्वांसाठी उपलब्ध करून दिली पाहिजे. दावे जितके मोठे, तितकी त्यामागची पारदर्शकता आणि उत्तरदायित्वही मोठे असले पाहिजे.

### शेतकऱ्याला हवे प्रत्यक्ष पाणी

मराठवाडा, विदर्भ आणि राज्यातील इतर दुष्काळप्रवण भागांमध्ये पावसाची अनिश्चितता कायम आहे. अशा परिस्थितीत शाश्वत सिंचन व्यवस्था उभारणे ही केवळ विकासाची योजना नसून ग्रामीण महाराष्ट्राच्या भवितव्याची गरज आहे. मोठे प्रकल्प, लघु सिंचन, भूजल पुनर्भरण, जलसंधारण आणि पाण्याचा कार्यक्षम वापर यांची एकात्मिक सांगड घालावी लागेल. परंतु या सर्वांचा केंद्रबिंदू शेतकरी असला पाहिजे. त्याला किती योजना जाहीर झाल्या, किती बैठका झाल्या किंवा किती निधी मंजूर झाला यापेक्षा त्याच्या शेतात पाणी उपलब्ध झाले की नाही, याच्याशी अधिक देणेघेणे आहे.

### आकड्यांपलीकडचा विकास

महाराष्ट्राला जलसंधारणाची गरज आहे, याबाबत कोणतेही दुमत नाही. प्रश्न सरकारने कामे केली की नाही, एवढाच नाही. प्रश्न आहे– त्या कामांचा प्रत्यक्ष परिणाम किती झाला? शासनाच्या कामगिरीचे मोजमाप करताना 'किती कामे झाली?' हा प्रश्न आवश्यक आहे; पण त्यापेक्षा महत्त्वाचा प्रश्न आहे– 'किती शेतकर्यांच्या शेतात पाणी पोहोचले?'

मंत्री महोदयांनी आकडे मांडले आहेत. आता त्या आकड्यांचे जमिनीवरील परिणामही महाराष्ट्रासमोर ठेवणे आवश्यक आहे. किती गावे जलसमृद्ध झाली, किती क्षेत्राला प्रत्यक्ष सिंचन मिळाले, किती प्रकल्प पूर्ण झाले आणि त्यातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात किती बदल झाला, याची पारदर्शक माहिती जनतेला मिळाली पाहिजे. कारण शेवटी शेतकरी घोषणांनी समाधानी होत नाही. त्याला हक्काचे आणि शाश्वत पाणी हवे आहे.

जलसमृद्ध महाराष्ट्राची खरी ओळख हजारो कोटींच्या खर्चात किंवा लाखो कामांच्या आकडेवारीत नसून, पावसावरचे शेतकर्याचे अवलंबित्व किती कमी झाले आणि त्याच्या शेतात विश्वासाने पाणी किती उपलब्ध झाले, यात आहे. आकडे कागदावर बदलता येतात; पण शेतकर्याच्या शेतातील कोरडी माती खोटे बोलत नाही. म्हणूनच आजचा खरा प्रश्न एकच आहे, जलसंधारणाच्या दाव्यांपलीकडे जाऊन महाराष्ट्रातील शेतकर्याच्या शेतात प्रत्यक्ष पाणी कधी पोहोचणार?

# शिक्षक : ज्ञानाचा दीप ते भविष्याचा शिल्पकार

५ सप्टेंबर हा दिवस देशभरात 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. शिक्षक दिन हा केवळ शिक्षकांना शुभेच्छा देण्याचा, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्याचा किंवा शाळा-महाविद्यालयांमध्ये औपचारिक कार्यक्रम आयोजित करण्याचा दिवस नाही. शिक्षणाचे व्यक्ती आणि समाजाच्या विकासातील महत्त्व समजून घेण्याचा, शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करण्याचा आणि भावी पिढी घडविण्याच्या प्रक्रियेत शिक्षकांच्या भूमिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याचा हा दिवस आहे. माणसाच्या जीवनात अनेक व्यक्ती येतात; परंतु त्याच्या विचारांना आकार देणाऱ्या, सुप्त क्षमतांना दिशा देणाऱ्या आणि आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या व्यक्तींमध्ये शिक्षकाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. शिक्षक विद्यार्थ्याला केवळ अक्षरज्ञान देत नाही, तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टी देतो. प्रश्न विचारणे, विचार करणे, निर्णय घेणे, अडचणींना सामोरे जाणे आणि जबाबदारीने वागणे या जीवनकौशल्यांची जडणघडणही शिक्षणातूनच होते. त्यामुळे शिक्षक हा केवळ शिक्षणव्यवस्थेतील एक घटक नसून समाजाच्या भवितव्याला आकार देणारा शिल्पकार आहे.

बालकाच्या समाजीकारण व व्यक्तिमत्त्वविकासात शाळेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे आणि या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी शिक्षक असतो. विद्यार्थ्यांच्या मनात असंख्य प्रश्न, कल्पना आणि विविध क्षमता दडलेल्या असतात. काही विद्यार्थी अभ्यासात प्रगती करतात, काही कला-क्रीडा क्षेत्रात चमकतात, तर काही विज्ञान, तंत्रज्ञान, नेतृत्व किंवा सामाजिक कार्यात विशेष रस दाखवतात. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता आणि शिकण्याची पद्धत वेगळी असते. ती ओळखून योग्य संधी उपलब्ध करून देणे हे शिक्षकाचे खरे कौशल्य आहे. विद्यार्थ्यांच्या उणिवांवर भर देण्याऐवजी त्यांच्या सामर्थ्याचा शोध घेऊन त्यांना प्रोत्साहन देणारा शिक्षक त्यांच्या आयुष्याला सकारात्मक दिशा देऊ शकतो. विद्यार्थ्याला 'तू हे करू शकतोस' असा विश्वास देणे ही शिक्षकाच्या कार्यातील सर्वांत मोठी शक्ती आहे.

आज शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. भ्रमणध्वनी, संगणक, इंटरनेट, इलेक्ट्रॉनिक पुस्तके, दृक-श्राव्य माध्यमे, ऑनलाइन अभ्यासक्रम, डिजिटल वर्ग आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांमुळे विद्यार्थ्यांच्या हातात माहितीचे प्रचंड भांडार उपलब्ध झाले आहे. त्यामुळे शिक्षकाची भूमिका केवळ माहिती देणाऱ्या व्यक्तीपुरती मर्यादित राहिलेली नाही. उपलब्ध माहितीची सत्यता तपासणे, योग्य-अयोग्य माहितीमधील फरक समजून घेणे, विविध स्त्रोतांचे मूल्यमापन करणे आणि माहितीचे ज्ञानात रूपांतर करणे ही कौशल्ये विद्यार्थ्यांना आत्मसात करून देणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. माहितीच्या महासागरात योग्य दिशा दाखविणारा शिक्षक आजही तितकाच आवश्यक आहे.

तंत्रज्ञान शिक्षणाची प्रक्रिया अधिक सुलभ आणि व्यापक करू शकते; मात्र ते शिक्षकाच्या मानवी भूमिकेची जागा घेऊ शकत नाही. संगणक माहिती देऊ शकतो, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रश्नांची उत्तरे देऊ शकते आणि डिजिटल माध्यमे अध्ययन सुलभ करू शकतात; परंतु विद्यार्थ्यांच्या मनातील भीती ओळखणे, त्याच्या अडचणी समजून घेणे, अपयशानंतर त्याला पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा देणे आणि त्याच्या क्षमतेवर विश्वास निर्माण करणे हे मानवी शिक्षकच करू शकतो. शिक्षक-विद्यार्थी संबंधातील विश्वास, संवाद आणि भावनिक जवळीक यांना तंत्रज्ञान पर्याय ठरू शकत नाही. म्हणून भविष्यातील शिक्षणात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करताना मानवी संवेदनशीलतेचा समतोल राखणे आवश्यक आहे.

या बदलत्या शैक्षणिक वातावरणाचा विचार करताना ग्रामीण भारतातील वास्तवाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. शहरांमधील अनेक विद्यार्थ्यांना संगणक, इंटरनेट, डिजिटल वर्ग आणि विविध शैक्षणिक साधने सहज उपलब्ध असतात; परंतु ग्रामीण आणि दुर्गम भागातील परिस्थिती वेगळी आहे. अनेक कुटुंबांमध्ये एकच भ्रमणध्वनी असतो आणि तोही पालकांच्या दैनंदिन कामासाठी वापरला जातो. काही भागांत इंटरनेटची सुविधा मर्यादित असते, तर काही ठिकाणी वीजपुरवठ्याच्या अडचणींमुळे डिजिटल शिक्षणावर परिणाम होतो. त्यामुळे तंत्रज्ञानाधारित शिक्षणाचा विस्तार करताना डिजिटल दरी कमी करणे आवश्यक आहे. साधने उपलब्ध करून देण्याबरोबरच ती प्रभावीपणे वापरण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

ग्रामीण शिक्षणाचे वास्तव मात्र डिजिटल साधनांच्या अभावापेक्षा अधिक व्यापक आहे. अनेक विद्यार्थी शेतकरी, शेतमजूर किंवा असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कुटुंबांतून येतात. शेतीचे हंगामी स्वरूप, पीकनुकसान, आर्थिक अडचणी, रोजगारासाठी होणारे स्थलांतर आणि घरातील जबाबदाऱ्या यांचा त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. शेतीच्या हंगामात काही मुलांना कुटुंबाला मदत करावी लागते, तर रोजगाराच्या शोधात कुटुंबाचे स्थलांतर झाल्यास त्यांच्या शिक्षणात खंड पडतो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्याला 'अभ्यासात मागे' म्हणून दोष देण्याऐवजी त्याच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. अनेक ग्रामीण शिक्षक अशा विद्यार्थ्यांशी आणि त्यांच्या पालकांशी सातत्याने संवाद साधून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्याचे प्रयत्न करतात. मर्यादित साधनांमध्येही विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारा शिक्षक ग्रामीण समाजाच्या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावतो.

ग्रामीण शाळा ही केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारी संस्था नसते; ती गावाच्या सामाजिक जीवनाचे महत्त्वाचे केंद्र असते. स्वच्छता, आरोग्य, पर्यावरणसंवर्धन, पाणीबचत, सामाजिक समता, लोकशाही मूल्ये आणि नागरिकत्वाची जाणीव निर्माण करण्यामध्ये शाळेचा मोठा वाटा असतो. शिक्षक विद्यार्थ्यांसोबतच पालक आणि ग्रामसमाजाशी संवाद साधत असल्याने त्याचे कार्य वर्गखोलीच्या पलीकडे विस्तारते. विशेषतः ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणासाठी शिक्षकाची भूमिका अधिक संवेदनशील ठरते. घरकामाची जबाबदारी, शाळेचे अंतर, सुरक्षित वाहतुकीचा अभाव, आर्थिक अडचणी आणि काही सामाजिक रूढी यांमुळे मुलींच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ शकतात. अशा वेळी पालकांमध्ये शैक्षणिक जाणीव निर्माण करणे, मुलींना सुरक्षित वातावरण देणे आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे हे शिक्षकाचे सामाजिक कर्तव्य ठरते. एका मुलीला शिक्षणाची संधी मिळणे म्हणजे तिच्यासोबत संपूर्ण कुटुंबाच्या आणि पुढील पिढीच्या विकासाच्या शक्यता वाढणे होय.

शिक्षणाचा उद्देश केवळ परीक्षेत चांगले गुण मिळविणे एवढाच नसावा. गुण, श्रेणी आणि निकाल यांना महत्त्व असले तरी ते विद्यार्थ्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे मोजमाप करू शकत नाहीत. एखादा विद्यार्थी गणित किंवा विज्ञानात प्रावीण्य मिळवू शकतो, तर दुसरा साहित्य, संगीत, चित्रकला, क्रीडा, अभिनय किंवा सामाजिक कार्यात उत्कृष्ट ठरू शकतो. विद्यार्थ्यांची जिज्ञासा, सर्जनशीलता, चिकित्सक विचार, सहकार्याची वृत्ती, समस्या सोडविण्याची क्षमता आणि सामाजिक संवेदनशीलता यांनाही शिक्षणात समान महत्त्व मिळाले पाहिजे. शिक्षकाने विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर जीवनासाठी तयार केले पाहिजे. प्रत्येक मुलामध्ये असलेली वेगळी क्षमता शोधून तिला योग्य दिशा देणे हीच शिक्षणाची खरी कसोटी आहे.

शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक विचारांची जडणघडण होणेही आवश्यक आहे. अफवा, चुकीची माहिती, अंधानुकरण आणि पूर्वग्रह वेगाने पसरत असताना प्रत्येक गोष्ट विवेकाने तपासण्याची सवय विद्यार्थ्यांना लागली पाहिजे. ह्यहे असे का?' हा प्रश्न विचारण्याची वृत्ती ज्ञानाची पहिली पायरी आहे. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारावेत, मतभेद व्यक्त करावेत, माहितीची चिकित्सा करावी आणि स्वतःच्या निष्कर्षापर्यंत पोहोचावे, यासाठी शिक्षकाने त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. प्रश्न विचारणारा विद्यार्थी त्रासदायक नसतो; तो जिज्ञासू असतो. अशा जिज्ञासेतूनच संशोधन, नवोन्मेष आणि सर्जनशील विचारांची निर्मिती होते.

शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती असल्याने शिक्षकाची भूमिका सामाजिक समता आणि न्यायाच्या निर्मितीतही महत्त्वाची आहे. विविध सामाजिक, आर्थिक, भाषिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीची मुले एकत्र शिकतात. या विविधतेतून समानता, सहकार्य आणि बंधुभावाची जाणीव निर्माण करण्याची संधी शिक्षकाला मिळते. कोणत्याही विद्यार्थ्याशी त्याच्या सामाजिक किंवा आर्थिक परिस्थितीवरून भेदभाव होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. समावेशक शिक्षणाच्या काळात दिव्यांग विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी, ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थी, विविध भाषिक पार्श्वभूमीची मुले आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना समान संधी देणे ही शिक्षणव्यवस्थेची जबाबदारी आहे. एखाद्या विद्यार्थ्याला शिकताना अडचण येत असेल, तर त्याला ह्यकमकुवत' ठरविण्याऐवजी त्याच्या शिकण्याची पद्धत समजून घेणे आणि आवश्यक ते वैयक्तिक मार्गदर्शन देणे अधिक योग्य ठरते.

या सर्व अपेक्षा पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना अनुकूल कार्यपरिस्थिती मिळणेही आवश्यक आहे. गुणवत्तापूर्ण अध्यापनाची अपेक्षा करताना शिक्षकांना आवश्यक शैक्षणिक साधने, प्रशिक्षण, पुरेसा वेळ आणि सर्जनशीलतेला वाव देणारे वातावरण मिळते का, याचाही विचार झाला पाहिजे. अध्यापनाबरोबर विविध प्रशासकीय कामांचा वाढता भार शिक्षकांवर पडत असेल, तर त्याचा परिणाम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणाऱ्या वेळेवर होऊ शकतो. शिक्षकाला केवळ आदेशांचे पालन करणारा कर्मचारी न मानता शैक्षणिक प्रक्रियेतील महत्त्वाचा बौद्धिक घटक म्हणून पाहणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक अध्यापनपद्धती, समावेशक शिक्षण आणि नवीन मूल्यमापन पद्धती याबाबत शिक्षकांना सातत्यपूर्ण प्रशिक्षण मिळाले पाहिजे. स्वतः सतत शिकणारा शिक्षकच विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची प्रेरणा निर्माण करू शकतो.

आजच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजांकडेही संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. अभ्यासाचा ताण, स्पर्धा, पालकांच्या अपेक्षा, सामाजिक माध्यमांचा प्रभाव आणि करिअरविषयीची चिंता यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक दबाव अनुभवत असतात. काहींना आपल्या अडचणी व्यक्त करता येत नाहीत. अशा वेळी शिक्षकाचा संवेदनशील संवाद विद्यार्थ्यासाठी मोठा आधार ठरतो. 'तुझा निकाल काय?' या प्रश्नाबरोबरच 'तुला काही अडचण आहे का?' हा प्रश्न विचारण्याची संवेदनशीलताही शिक्षणाचा भाग आहे. विद्यार्थ्याच्या प्रगतीसाठी पालक आणि शिक्षक यांच्यातील सहकार्य तितकेच महत्त्वाचे आहे. केवळ गुणांवर आधारित तुलना करण्याऐवजी विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार त्याच्या प्रगतीकडे पाहिले पाहिजे. घर आणि शाळा या दोन्हीकडून प्रोत्साहन मिळाल्यास विद्यार्थ्याचा आत्मविश्वास अधिक दृढ होतो.

पर्यावरणीय संकटे, पाण्याची समस्या, हवामानातील बदल, सामाजिक विषमता, बेरोजगारी, डिजिटल गैरवापर आणि वाढती सामाजिक असहिष्णुता यांसारख्या प्रश्नांसमोर आजचा समाज उभा आहे. या समस्यांना सामोरे जाण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नाही; सामाजिक संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीवही आवश्यक आहे. पर्यावरणाचे संरक्षण, सार्वजनिक संपत्तीचे जतन, सामाजिक सहकार्य, संविधानिक मूल्ये आणि नागरिक म्हणून असलेली कर्तव्ये यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून देणे ही शिक्षकाची व्यापक सामाजिक जबाबदारी आहे. आजच्या वर्गखोलीतून उद्याचा समाज घडत असतो. त्यामुळे शिक्षकाचे अध्यापन आणि त्याचे आचरण या दोन्हींचा विद्यार्थ्यांवर दीर्घकालीन प्रभाव पडतो.

शिक्षकाला दिलेली खरी आदरांजली म्हणजे केवळ शिक्षक दिनाच्या दिवशी शुभेच्छा देणे नव्हे. शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानाचा आणि मूल्यांचा आपल्या जीवनात उपयोग करणे हीच त्यांच्याप्रती खरी कृतज्ञता आहे. एखादा विद्यार्थी प्रामाणिकपणे काम करतो, अडचणीत असलेल्या व्यक्तीला मदत करतो, अन्यायाविरुद्ध आवाज उठवतो, स्वतःच्या यशाबरोबर समाजाचाही विचार करतो आणि संकटांना धैर्याने सामोरा जातो, तेव्हा त्याच्या वर्तनातून शिक्षकाच्या कार्याचे खरे प्रतिबिंब दिसते. शिक्षकाच्या कार्याचे अंतिम यश केवळ गुणपत्रिकेत नव्हे, तर विद्यार्थ्याच्या विचारांत, वर्तनात आणि जीवनमूल्यांत दिसून येते.

शिक्षक दिन हा त्यामुळे शिक्षकांचा गौरव करण्याबरोबरच शिक्षणव्यवस्थेच्या भवितव्याचा विचार करण्याचा दिवस आहे. समाजाने शिक्षकांकडून मोठ्या अपेक्षा ठेवताना त्यांना आवश्यक साधने, प्रशिक्षण, सन्मान आणि विश्वास देणेही गरजेचे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जबाबदारी केवळ शिक्षकांवर सोपवून समाजाची भूमिका संपत नाही. शासन, शिक्षणसंस्था, पालक, विद्यार्थी आणि समाज या सर्वांनी शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांना आवश्यक पायाभूत सुविधा, सक्षम शिक्षकवर्ग आणि डिजिटल साधने उपलब्ध करून देणे ही सामाजिक गुंतवणूक आहे. शिक्षणाची गुणवत्ता सुधारली तर त्याचा लाभ केवळ विद्यार्थ्यांना होत नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासाला मिळतो.

शिक्षक हा वर्तमानातील विद्यार्थ्याला भविष्याशी जोडणारा दुवा आहे. तो अज्ञानातून ज्ञानाकडे, भीतीतून आत्मविश्वासाकडे, अंधानुकरणातून चिकित्सक विचाराकडे आणि स्वकेंद्रिततेतून सामाजिक जबाबदारीकडे नेणारी वाट दाखवतो. त्याच्या हातात केवळ पुस्तक किंवा अध्यापनाचे साधन नसते; भावी समाज घडविण्याची जबाबदारीही असते. म्हणून शिक्षकाचा सन्मान हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून ज्ञानाचा, शिक्षणाचा आणि समाजाच्या भवितव्याचा सन्मान आहे.

५ सप्टेंबरचा शिक्षक दिन एका दिवसापुरत्या औपचारिक शुभेच्छांमध्ये अडकून राहू नये. प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण आणि समताधिष्ठित शिक्षण मिळावे, प्रत्येक शिक्षकाला सन्मानपूर्वक व अनुकूल कार्यपरिस्थिती मिळावी, ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांना आवश्यक सुविधा मिळाव्यात, डिजिटल दरी कमी व्हावी, विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा आणि शिक्षणातून संवेदनशील, विवेकी व जबाबदार नागरिक घडावेत, हा व्यापक संकल्प या दिवसातून पुढे यायला हवा. शिक्षकाच्या हातातील खडू, लेखणी किंवा डिजिटल साधन हे केवळ अध्यापनाचे माध्यम नसते; त्यातून एका पिढीच्या विचारविश्वाची निर्मिती होत असते. म्हणूनच शिक्षक हा केवळ वर्गखोलीतील अध्यापक नसून उद्याच्या समाजाचा शिल्पकार आहे. ज्ञानाचा दीप प्रज्वलित करणाऱ्या शिक्षकांच्या कार्याला मनःपूर्वक अभिवादन करणे, त्यांच्या कार्याला सक्षम वातावरण उपलब्ध करून देणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वप्नांना समान संधी देणे हीच शिक्षक दिनाची खरी सार्थकता ठरेल.



- डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

## विश्वशांती गुरुकुलमध्ये कृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केगाव येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव विविध सांस्कृतिक आणि मनोरंजक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. बालवयातच विद्यार्थ्यांना भारतीय सण-उत्सवांचे महत्त्व समजावे आणि आपल्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेशी त्यांची नाळ जोडली जावी या उद्देशाने विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले होते. या उत्सवातील 'लिटल राधा-कृष्ण' उपक्रम विशेष आकर्षण ठरला. विद्यार्थ्यांनी कृष्ण, राधा आणि गोपिकांची आकर्षक पारंपरिक वेशभूषा साकारत कार्यक्रमात रंगत आणली. राधा-कृष्णाच्या पारंपरिक पोशाखातील बालगोपाळांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली दहीहंडीमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. यानंतर कृष्णभजन, कठपुतळीचा खेळ अशा विविध मनोरंजक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संगीत व अभिनयाच्या माध्यमातून बालगोपाळांनी श्रीकृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंग आणि बाललीला उत्स्फूर्तपणे साकारत उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका रुपाली हजारे म्हणाल्या 'शिक्षण आणि मनोरंजनाबरोबरच सांस्कृतिक मूल्ये जोपासणाऱ्या जन्माष्टमीच्या या उत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव मिळण्याबरोबरच त्यांच्यामध्ये एकमेकांविषयी प्रेम, आपुलकी आणि सहकार्याची निर्माण होण्यास मदत होते.' भारतीय संस्कृती आणि परंपरांबद्दल आत्मीयता निर्माण करणारा हा कृष्ण जन्माष्टमी उत्सव विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरला.

## नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील नामांकित नागेश करजगी ऑर्किड स्कूल मध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीही 'श्रीकृष्ण जन्माष्टमी' आणि गोपाळकाला अत्यंत भक्तीमय व उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाची सुरुवात भगवान श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन आणि आरतीने झाली. या प्रसंगी शाळेचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, शाळेच्या मार्गदशीर्का मीना पारखे, प्राचार्या रश्मी कुंभार, आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्राचायार्नी विद्यार्थ्यांना संबोधित करताना श्रीकृष्ण जन्माचे महत्त्व, त्यांच्या बाललीला आणि त्यांनी भगवद्गीतेच्या माध्यमातून दिलेला कर्मयोग व जीवन जगण्याचा संदेश अत्यंत सोप्या भाषेत समजावून सांगितला. समाजात एकोपा, बंधुभाव आणि संघभावना टिकवून ठेवणे हीच काळाची गरज असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात नमूद केले.याप्रसंगी प्री-प्रायमरी आणि प्रायमरी विभागातील विद्यार्थ्यांनी राधा-



कृष्णाच्या सुंदर आणि आकर्षक पारंपरिक पोशाख परिधान केला होता. बालगोपाळांच्या या मनमोहक रूपामुळे संपूर्ण शाळा परिसर गोकुळनगरीसारखा भासत होता. विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित विविध भक्तीगीते आणि मनमोहक नृत्ये सादर केली.याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी, संस्थेच्या सचिवा सौ.वर्षाताई विभुते यांनी विद्यार्थ्यांना श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'दहीहंडी उत्सव'. शाळेच्या मैदानावर सजवलेली दहीहंडी फोडण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. प्राचार्या रश्मी कुंभार यांच्या प्रमुख उपस्थितीत 'गोविंदा रे गोपाळा' च्या गजरात आणि ढोल-ताशांच्या तालावर चिमुकल्या गोविंदांनी मानवी मनोरे रचून दहीहंडी फोडली. उपस्थित शिक्षक आणि पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना पोह्यांच्या गोपाळकाल्याचा प्रसाद वाटण्यात आला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेचे व्यवस्थापन, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वात्रटिका

### डीजे वाजला

बाप्पा येण्याआधीच
डीजे वाजू लागला...
कानावर येण्याऐवजी
कानाखाली आवाज आला...
सुरुवात पुण्यातून होते आणि
तिथेच होते आदळआपट...
तोंड बंद केले जाते रागाने
जेव्हा बोलतो एखाद्या बापट...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. RNI No. MAHMAR 2006/17624

# गणेशोत्सवात डीजेला परवानगी नाही

## ध्वनिप्रदूषण करणाऱ्यांवर कठोर कारवाई



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त) :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर यंदाही डीजेला परवानगी दिली जाणार नसून, नियमानुसार आवश्यक त्या ध्वनिक्षेपकांना परवानगी देण्यात येणार आहे. निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आवाज करून ध्वनिप्रदूषण करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांनी दिला. कायदा सर्वांसाठी समान असून, गणेश मंडळांनी नियमांचे पालन करून उत्सव साजरा करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

शहरातील प्रियदर्शनी मंगल कार्यालयात गुरुवारी ह्यश्री गणेशोत्सव सोहळा २०२६ह्व अंतर्गत शांतता समिती व गणेश मंडळांच्या नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कबाडे बोलत होते.

या बैठकीस तहसीलदार विनायक मगर, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र टाकणे, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, सहायक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे, वटवृक्ष देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, दुधनीचे नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे, योगिनाथ बाजारमठ यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

डीजे चालकांच्या उपजीविकेचा प्रश्न असला तरी ध्वनिप्रदूषणासंदभार्तील नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. सोलापूर शहरातील मागील अनुभव पाहता पारंपरिक मिरवणुकीतील ध्वनिव्यवस्थेचा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अक्कलकोटमध्येही ध्वनिप्रदूषण होणार नाही, याची जबाबदारी गणेश मंडळांनी घ्यावी, असे कबाडे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी 'एक बेस आणि एक टॉप' अशा मर्यादित ध्वनिव्यवस्थेला परवानगी देण्याची मागणी केली. गणेशमूर्ती स्थापना व मिरवणुकीसाठी आवश्यक परवानग्या घेणे बंधनकारक असून, मंडळांनी मागणी केलेल्या मिरवणूक मार्गाची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतरच परवानगी दिली जाणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. परवानगीची प्रक्रिया पोर्टलवर अर्ज अपलोड करून पूर्ण करता येणार असून, जुन्या मंडळांना तातडीने परवानगी देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

### मिरवणूक मार्गावरील अडथळे दूर करण्याच्या सूचना

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रमुख मिरवणूक मार्गाची दोन दिवसांत पाहणी करून संयुक्त बैठक घ्यावी, तसेच मागार्तील अडथळे तातडीने दूर करावेत, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या. विद्युत तारा व इतर अडथळे हटवावेत, रस्त्यांवरील खड्डे पाचव्या दिवसापर्यंत बुजवावेत आणि मिरवणूक मार्गावर पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

### सामाजिक उपक्रमांवर भर देण्याचे आवाहन

सध्या पाण्याची मोठी टंचाई असल्याने गणेश मंडळांनी वर्गणीतील काही निधी सामाजिक उपक्रमांसाठी वापरावा, अशी सूचनाही बैठकीत करण्यात आली. अक्कलकोट ही स्वामी समर्थांची पुण्यनगरी असल्याने येथील पारंपरिक सांस्कृतिक व धार्मिक परंपरा जपत गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले.

भारत गल्ली परिसरातील हिंदू-मुस्लीम ऐक्याची परंपरा कायम ठेवत सर्व उत्सवांना समान न्याय मिळावा, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी दिलीप सिद्धे, संजय देशमुख, अश्पाक बळोरगी, अविनाश मडिखांबे, चंद्रशेखर मडिखांबे, रुद्रय्या स्वामी, सूर्यकांत बिराजदार, संजय किणीकर, अल्ताफ पटेल आदींनी मनोगत व्यक्त केले. पोलीस निरीक्षक अविनाश पवार यांनी प्रास्ताविक केले. बैठकीस नगरसेवक यशवंत धोंगडे, तम्मा शेळके, प्रवीण शहा, रमेश कापसे आदी उपस्थित होते.

# दोषींवर खुनाचा गुन्हा दाखल करून जलदगती न्यायालयात खटला चालविण्याची मागणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कर्तव्य बजावत असताना ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले, वाढती असुरक्षितता आणि मानसिक त्रासाच्या घटनांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या वतीने मंगळवारी जिल्हा परिषद कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मूकमोर्चा काढण्यात आला.

जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे येथे १७ ऑगस्ट रोजी ग्रामसभेत शासकीय कामकाज सुरू असताना ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांच्यावर अमानुष हल्ला झाला. या घटनेनंतर झालेल्या मानसिक व शारीरिक त्रासामुळे त्यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेचा तीव्र निषेध करत ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

पी. एन. पाटील यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या दोषींवर खुनाचा गुन्हा दाखल करून खटला जलदगती न्यायालयात चालवावा, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली. तसेच ग्रामपंचायतीच्या वर्षभरात होणाऱ्या १० ते १२ ग्रामसभांऐवजी वषार्तून केवळ एक आर्थिक नियोजन व आढावा ग्रामसभा घेण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली.

ग्रामसभांमध्ये अनधिकृत व्हिडिओ चित्रीकरण करून ते सोशल मीडियावर प्रसारित करत कर्मचाऱ्यांची बदनामी करण्याच्या प्रकारांवर कायदेशीर बंदी घालावी, संवेदनशील ग्रामसभांसाठी विनामूल्य पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा, तसेच इतर विभागांच्या विशेष ग्रामसभांची जबाबदारी संबंधित विभागांवरच सोपवावी, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय वैयक्तिक लाभाच्या योजनांमधील लाभार्थी निवड प्रक्रिया तालुका स्तरावरून पारदर्शक पद्धतीने राबवावी, अशी मागणीही ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी केली.

या मूकमोर्चात युनियनचे जिल्हाध्यक्ष शरद भुजबळ, मानद अध्यक्ष सुशेन ननवरे, कार्याध्यक्ष नारायण ढवळे, सरचिटणीस दयानंद पाटील यांच्यासह जिल्ह्यातील बहुसंख्य ग्रामपंचायत अधिकारी सहभागी झाले होते. जिल्हा परिषद लिपिकवर्गीय संघटनेच्या वतीने राजेश देशपांडे यांनी आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला.

---

**MADHESWARI URBAN MULTIPLE NIDHI LIMITED**
**Regd. off: 3470 Telgirnee Chowk Barshi Solapur MH 413411**
Email ID- madheshnidhi555@gmail.com CIN: U65990PN2018PLC180988

**NOTICE OF THE 8th ANNUAL GENERAL MEETING**

Notice is hereby given to all Shareholders in pursuant to Section 2 (20) and 91 of the Companies Act, 2013 and read with Companies Rules, 2014 and other applicable law the Company would be conducting AGM on Wednesday, 30th September, 2026 at 2.00 PM .at 3470 Telgirnee Chowk Barshi Solapur 413411 on Physically with the transact the business as below:-

ORDINARY BUSINESS:

a) To receive, consider and adopt the Audited Financial Statements for the year ended 31" March 2026, together with the Director's Report and the Auditor's Report thereon.

b) To consider and if thought fit, to pass with or without modification, the following Resolution as an Ordinary Resolution:

"RESOLVED THAT Mr Abhijit Ashok Lunawat [DIN: 08076922], Director, who retires by rotation and being eligible offers himself for reappointment, be and is hereby reappointed as the Director of the Company, liable to retire by rotation."

In Compliance with aforementioned section, electronic Copies of the Notice of the AGM and Annual Report 2025-2026 have been sent to the Members whose Email ID are available and registered with Company. The members who do not receive Notice can get the same at the registered office of the Company. The Company requests all the shareholders who have not yet registered /updated their email id with Company to register the same within 3 days from publication of this public notice.

All the members/shareholders are requested to attend the Meeting. The Annual report of the Company can be inspected at the registered office of the Company and Financial Statement with enclosures are affixed in the Notice Board of the Company and Shareholders are entitled to vote either in person or through proxy. Any Query/grievances in this matter may be addressed at E-mail ID madheshnidhi555@gmail.com.

By order of the Board
For Madheswari Urban Multiple Nidhi Limited
Mr. Ashok Dagadulal Lunawat
Chairman (DIN: 08312540)

Place: Barshi
Date: 05/09/2026

---

**माढेश्वरी अर्बन मल्टीपल निधी लिमिटेड**
**रेजिस्टर ऑफिस: 3470 तेलगिरणी चौक बार्शी सोलापूर** MH ४१३४११
Email ID- madheshnidhi555@gmail.com CIN: U65990PN2018PLC180988

**८ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम २ (२०) आणि ९१ नुसार आणि कंपनी नियम, २०१४ आणि इतर लागू कायद्यांनुसार सर्व भागधारकांना याद्वारे सूचना देण्यात आली आहे, कंपनी ची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, ३० सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता नोंदणीकृत कार्यालय 3470 तेलगिरणी चौक बार्शी सोलापूर MH ४१३४११ येथे आयोजित केली आहे. त्या मध्ये खालील व्यवहार केले जातील:-

सामान्य विषय

a) ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या वर्षासाठी लेखापरीक्षित वित्तीय विवरणे प्राप्त करणे, संचालकांचा अहवाल आणि त्यावरील लेखापरीक्षकांचा अहवाल विचारात घेणे आणि स्वीकारणे,

b) खालील ठराव एक सामान्य ठराव म्हणून विचारात घेणे आणि योग्य वाटल्यास, बदलांसह किंवा त्या शिवाय पास करणे,

''निर्धारित केले, श्री. अभिजीत अशोक लुनावत [DIN:08076922] संचालक, जे रोटेशनद्वारे सेवा निवृत्त होत आहेत आणि पात्र असल्याने ते स्वतः पुनर्नियुक्ती चा प्रस्ताव देत आहे, त्यांची कंपनीचे संचालक म्हणून पुनर्नियुक्ती केली जाईल, जे रोटेशन व्दारे निवृत्त होण्यास जबाबदार असतील.''

उपरोक्त कलमाचे पालन करून, ज्या भाग धारकांचे शेअर होल्डिंगरु. १०००/- पेक्षा जास्त आहे, त्यांना वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत देण्यात येईल, इतर भागधारकांसाठी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात ती मिळवू शकेल. कंपनी सर्व भागधारकांना विनंती करते की ज्यांनी अद्याप कंपनीकडे त्यांचा ई मेलआयडी नोंदणीकृत / अपडेट केलेला नाही त्यांनाही सार्वजनिक सूचना प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसांच्या आत नोंदणी करावी.

सर्वसभासद/भागधारकांनी सभेला उपस्थित राहावे, ही विनंती. कंपनीच्या वार्षिक अहवालाची प्रत कंपनीच्या नोटिसबोर्डवर सर्व लावण्यात आली आहे आणि कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात तपासणी केली जाऊ शकते, भागधारकांना वैयक्तिकरित्या किंवा प्रॉक्सीद्वारे मतदान करण्याचा अधिकार आहे.

सभासद/ भागधारकांनी या प्रकरणातील कोणतीही शंका/तक्रारी madheshnidhi555@gmail.com ई-मेल आयडीवर पाठवावी.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
माढेश्वरी अर्बन मल्टीपल निधी लिमिटेड
श्री.अशोक दगडूलाल लुणावत
अध्यक्ष (DIN:08312540)

ठिकाण: बार्शी
तारीख: ०५/०९/२०२६

---

**माढेश्वरी अर्बन मल्टी पर्पज निधी लिमिटेड**
**रेजिस्टर ऑफिस: C/o** R-847/9 (C-3) **भोरीलाल तेजराज शर्मा मु.कुर्डूवाडी तालुका माढा जि.सोलापूर** MH **४१३२०८**
Email ID- sudhirmore599@gmail.com CIN: U65991PN2021PLN202245

**5th वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम २ (२०) आणि ९१ नुसार आणि कंपनी नियम, २०१४ आणि इतर लागू कायद्यांनुसार सर्व भागधारकांना याद्वारे सूचना देण्यात आली आहे, कंपनी ची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, ३० सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता नोंदणीकृत कार्यालय C/o भोरीलाल तेजराज शर्मा कुर्डुवाडी तालुका माढा R-847/9 (C-3) कुर्डुवाडी, कुर्डुवाडी सोलापूर MH ४१३२०८ IN येथे आयोजित केली आहे. त्या मध्ये खालील व्यवहार केले जातील:-

सामान्य विषय

a) ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या वर्षासाठी लेखापरीक्षित वित्तीय विवरणे प्राप्त करणे, संचालकांचा अहवाल आणि त्यावरील लेखापरीक्षकांचा अहवाल विचारात घेणे आणि स्वीकारणे,

b) खालील ठराव एक सामान्य ठराव म्हणून विचारात घेणे आणि योग्य वाटल्यास, बदलांसह किंवा त्या शिवाय पास करणे, ''निर्धारित केले, श्री अशोक दगडूलाल लुणावत [DIN:08312540] संचालक, जे रोटेशनद्वारे सेवानिवृत्त होत आहेत आणि पात्र असल्याने स्वतः पुनर्नियुक्ती चा प्रस्ताव देत आहे, त्यांची कंपनीचे संचालक म्हणून पुनर्नियुक्ती केली जाईल, जे रोटेशन व्दारे निवृत्त होण्यास जबाबदार असतील.

उपरोक्त कलमाचे पालन करून, ज्या भागधारकांचे शेअरहोल्डिंग रु. १०००/- पेक्षा जास्त आहे, त्यांना वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत देण्यात येईल, इतर भागधारकांसाठी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात ती मिळवू शकेल. कंपनी सर्व भागधारकांना विनंती करते की ज्यांनी अद्याप कंपनीकडे त्यांचा ईमेल आयडी नोंदणीकृत/अपडेट केलेला नाही त्यांनाही सार्वजनिक सूचना प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसांच्या आत नोंदणी करावी.

सर्व सभासद / भागधारकांनी सभेला उपस्थित राहावे, ही विनंती. कंपनीच्या वार्षिक अहवालाची प्रत कंपनीच्या नोटिस बोर्ड वर सर्व लावण्यात आली आहे आणि कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात तपासणी केली जाऊ शकते, भागधारकांना वैयक्तिकरित्या किंवा प्रॉक्सी द्वारे मतदान करण्याचा अधिकार आहे.

सभासद/भागधारकांनी या प्रकरणातील कोणतीही शंका/तक्रारी sudhirmore599@gmail.com ई-मेल आयडीवर पाठवावी.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
माढेश्वरी अर्बन मल्टी पर्पज निधी लिमिटेड
श्री. अशोक दगडूलाल लुणावत
अध्यक्ष (DIN:८३१२५४० )

ठिकाण: कुर्डुवाडी जिल्हा. सोलापूर
तारीख: ०५/०९/२०२६

---

**MADHESWARI URBAN MULTIPURPOSE NIDHI LIMITED**
**Regd. off: C/O Bhorilal Tejaraj Sharma Kurudwadi Taluka Madha R-847/9 (C-3) Kurudwadi, Solapur, Kurudwadi, Maharashtra, India, 413208**
Email ID- sudhirmore599@gmail.com CIN: U65991PN2021PLN202245

**NOTICE OF THE 5th ANNUAL GENERAL MEETING**

Notice is hereby given to all Shareholders in pursuant to Section 2 (20) and 91 of the Companies Act, 2013 and read with Companies Rules, 2014 and other applicable law the Company would be conducting AGM on Wednesday, 30th September, 2026 at 11.00 A.M.at C/O Bhorilal Tejaraj Sharma Kurudwadi Taluka Madha R-847/9 (C-3) Kurudwadi Solapur 413208 on Physically with the transact the business as below :-

ORDINARY BUSINESS:

a) To receive, consider and adopt the Audited Financial Statements for the year ended 31 March 2026, together with the Director's Report and the Auditor's Report thereon.

b) To consider and if thought fit, to pass with or without modification, the following Resolution as an Ordinary Resolution:

"RESOLVED THAT Mr Ashok Dagadulal Lunawat [DIN: 08312540], Director, who retires by rotation and being eligible offers himself for reappointment, be and is hereby reappointed as the Director of the Company, liable to retire by rotation."

In Compliance with aforementioned section, electronic Copies of the Notice of the AGM and Annual Report 2025-2026 have been sent to the Members whose Email ID is available and registered with Company. The members who do not receive Notice can get the same at the registered office of the Company. The Company requests all the shareholders who have not yet registered /updated their email id with Company to register the same within 3 days from publication of this public notice.

All the members/shareholders are requested to attend the Meeting. The Annual report of the Company can be inspected at the registered office of the Company and Financial Statement with enclosures are affixed in the Notice Board of the Company and Shareholders are entitled to vote either in person or through proxy. Any Query/grievances in this matter may be sudhirmore599@gmail.com

By order of the Board
For Madheswari Urban Multipurpose Nidhi Limited
Mr. Ashok Dagadulal Lunawat
Chairman (DIN: 08312540)

Place: Kurudwadi
Date: 05/09/2026

---


# Classified - छोटी जाहीरात

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

---

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ■ | ४ | ५ | | ६ | ■ | ७ | |
| ८ | | | ■ | ९ | | | ■ | | ■ | | ■ |
| १० | | ■ | ११ | | | ■ | ■ | १२ | | | ■ |
| | ■ | ■ | | ■ | ■ | १३ | | | ■ | ■ | १४ |
| १५ | १६ | | | | १७ | | ■ | १८ | १९ | २० | |
| २१ | | ■ | ■ | ■ | २२ | | २३ | ■ | २४ | | ■ |
| २५ | | २६ | ■ | २७ | | ■ | २८ | | | ■ | २९ |
| | ■ | ३० | | | ■ | ३१ | | ■ | ■ | ३२ | |
| ३३ | | | ■ | ३४ | | ■ | ३५ | ३६ | | | |
| | ■ | ३७ | ३८ | | ■ | ३९ | | | ■ | | ■ |
| ४० | ४१ | ■ | | ■ | ४२ | | | ■ | ४३ | | ४४ |
| ४५ | | | | ■ | | ■ | ■ | ४६ | | ■ | |

**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 48

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | 2 | 1 | | 7 | | | 6 |
| | 4 | | | | 6 | | | |
| 1 | 9 | | | | 4 | 7 | | 3 |
| | 7 | 8 | 4 | | | | 6 | 2 |
| | | 9 | 7 | | 3 | | 8 | 5 |
| | | | | 2 | | 3 | | 4 |
| | | 4 | 6 | | 2 | | | 1 |
| 2 | 5 | | 8 | | 1 | 6 | | |
| | 1 | 3 | | | 9 | | 2 | |

# क्राइम पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी विशाल भांगे तर खजिनदार रवी मस्के सचिव परशुराम कोकणे



**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** सोलापूर क्राइम पत्रकार संघाच्या सन 2026 -27 या वर्षासाठी नवराष्ट्रचे विशाल भांगे यांची अध्यक्षपदी तसेच खजिनदार म्हणून रवी मस्के आणि सचिव म्हणून परशुराम कोकणे यांची एकमताने निवड करण्यात आली. शासकीय विश्रामगृहामध्ये शुक्रवारी दुपारी पत्रकार विनायक होटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वसाधारण सभेत ही निवड करण्यात आली.

प्रारंभी लोकमतचे आप्पासाहेब पाटील यांनी प्रास्ताविक केले त्यानंतर पुण्यनगरीचे भरतकुमार मोरे, कटूसत्यचे पांडुरंग सुरवसे यांच्यासह अनेकांनी आपली मनोगते व्यक्त केली. क्राइम पत्रकारांच्या एकजुटीसाठी आणि विविध उपक्रमाचे आयोजन पुढील काळात करण्यासाठी सर्वांनी एकत्रित येवून काम करण्याचे यावेळी ठरवण्यात आले.

अध्यक्ष - विशाल भांगे, उपाध्यक्ष विजयकुमार बाबर, इरफान शेख, विश्वभूषण लिमये, योगेश तुरेराव, कार्याध्यक्ष अश्विनी तडवळकर, आप्पासाहेब पाटील, सचिव परशुराम कोकणे, सहसचिव शहानवाज शेख, इब्राहीम मुजावर, खजिनदार रविंद्र मस्के, सहखजिनदार लक्ष्मीकांत शिंदे, दिनेश शिंदे, प्रसिध्दीप्रमुख तौसिफ शेख, प्रमोद तुपसमुद्रे, यासिन शेख, कार्यकारिणी सदस्य सुर्यकांत आसबे, शिवाजी सुरवसे, विनायक होटकर, उमाकांत चौडे, भरतकुमार मोरे, वैभव गंगणे, दिगंबर इप्पलपल्ली, इम्रान सगरी, विनोद कामतकर, रोहन नंदाणे, सल्लागार - अविनाश कुलकर्णी, राजकुमार नरूटे, भगवान परळीकर, संजय येऊलकर, पांडुरंग सुरवसे, विधी सल्लागार - ॲड. प्रदीपसिंह रजपूत, ॲड. संतोष न्हावकर यांची नियुक्ती करण्यात आली. यानंतर सर्व नवीन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. याबैठकीला सागर सुरवसे, आफताब शेख, अभिषेक आदेप्पा, विक्रांत कालेकर, गौसपाक पटेल, अनिकेत गायकवाड, राहुल रणदिवे, संतोष कसे, रवि ढोबळे, राजकुमार पवार, चंदन बोल्लू, सौरभ वाघमारे, जागृत रणदिवे, अकबर बागवान, नागेश चिप्पा, फय्याज शेख यांच्यासह पत्रकार मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात कोठेही चारा टंचाई निर्माण होणार नाही याची दक्षता घ्या -जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** एल निनो च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात माहे ऑगस्ट 2026 अखेरपर्यंत 189 मिलिमीटर इतका पाऊस झालेला आहे. परतीचा पाऊस ही पडला नाही तर चारा टंचाईची परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागाने तालुका, मंडळ व गावनिहाय चारा उपलब्धतेचे काटेकोरपणे नियोजन करावे. चारा बियाण्यासाठी नियोजन समिती मधून अतिरिक्त एक कोटीचा निधी तात्काळ मंजूर करण्यात येत असून जिल्ह्यात कोठेही चारा टंचाई निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागात एल निनो च्या संदर्भात पाणी चारा खते बियाणे या अनुषंगाने आढावा जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी घेतला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका आशिष लोकरे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त विशाल येवले, उजनी धरण व्यवस्थापन अधीक्षक अभियंता सुभवेंद्र खांडेकर, एमजीपीचे अधीक्षक अभियंता अनिल पाटील, महापालिका सहायक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या सह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले की जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या चाऱ्याचे योग्य नियोजन करावे. तसेच उत्तर सोलापूर दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यात पुढील तीन महिने पुरेल एवढा चारा उपलब्ध आहे तर इतर तालुक्यांमध्ये पुढील चार ते पाच महिने पुरेल एवढा चारा उपलब्ध असल्याचे आकडेवारीवरून दिसते. परंतु पशुसंवर्धन विभागाने कृषी विभागाच्या तालुका निहाय अधिकारी यांच्या समवेत बसून तालुका, मंडळ व गावनिहाय चारा उपलब्धताची माहिती पुढील आठ दिवसात तयार करावी. तसेच चारा बियाण्यासाठी नियोजन समितीकडून तात्काळ एक कोटीचा अतिरिक्त निधी देण्यात येत असून पशुसंवर्धन विभागाने आवश्यकतेप्रमाणे अधिक निधीची मागणी नियोजन समितीला करावी असेही त्यांनी सुचित केले.

उजनी धरण 100% भरलेले असून उजनी धरण व्यवस्थापन विभागाने पाण्याचे योग्य नियोजन करावे. तसेच जिल्ह्यातील किती लहान व मध्यम पाणी प्रकल्पातील पाणीसाठा उजनी धरणातून भरलेला आहे याची माहिती दोन दिवसात सादर करावी. तसेच भीमा व सीना नदीवर असलेल्या बॅरेजच्या लोखंडी बर्गे दुरुस्ती साठी नियोजन समितीकडे निधीची मागणी करावी. तर जलसंपदा विभागाने त्यांच्याकडील 39 केटीवेअर दुरुस्तीसाठी आवश्यक असलेला सात कोटीच्या निधीची मागणी ही नियोजन समितीला करावी अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या.

जिल्ह्यात 30 ऑगस्ट पर्यंत 189 मिलिमीटर पाऊस झालेला असल्याने कृषी विभागाने टंचाईच्या अनुषंगाने प्रत्येक तालुक्यातील मंडळनिहाय कसा पाऊस झाला आहे त्याची माहिती द्यावी. तसेच टंचाईच्या निकषात बसणाऱ्या मंडळाची व गावांची माहिती घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांनी जिल्ह्यात खरीप हंगामात खते व बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत त्याप्रमाणेच रब्बी हंगामासाठी ही पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती देऊन 16 ऑगस्ट 2026 पर्यंत जिल्ह्यात 105 टक्के खरीपाची पेरणी झाल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यात 189 मिलिमीटर पाऊस झाला असून करमाळा तालुक्यात सरासरीच्या 86 टक्के तर इतर तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी असल्याचे त्यांनी सांगितले.

पशुसंवर्धन उपायुक्त विशाल येवले म्हणाले की जिल्ह्यात मोठ्या जनावरांची संख्या बारा लाख तर लहान जनावरांची संख्या आठ लाख इतकी असून प्रतिदिन बावीस हजार मेट्रिक टन चाऱ्याची आवश्यकता असून 52 लाख 400 मेट्रिक टन चारा उपलब्ध होणार आहे. त्याप्रमाणेच खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच नियोजन समितीकडील दोन कोटीच्या निधीतून 7000 शेतकऱ्यांना चारा पिके घेण्यासाठी बियाणे उपलब्ध करून दिलेले आहे. हा चारा सप्टेंबर अखेरपर्यंत उपलब्ध होईल. तसेच सद्यस्थितीत तीन ते चार महिने पुरेल एवढा चारा जिल्ह्यात उपलब्ध होईल असेही त्यांनी सांगितले. उजनी धरण व्यवस्थापन चे अध्यक्ष अभियंता खांडेकर यांनी उजनी धरण तसेच जिल्ह्यातील विविध लहान व मध्यम पाणी प्रकल्पातील पाणीसाठा विषय माहिती बैठकीत दिली.

# सिंहगड पब्लिक स्कूलमध्ये दहीहंडी उत्सवाचा जल्लोष
## 'गोविंदा आला रे आला'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत उत्सवाची रंगत वाढवली. 'गोविंदा आला रे आला'च्या जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला.

फौजदार चावडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विकास देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते तसेच सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या उपस्थितीत भगवान श्रीकृष्णाची विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी आकर्षक दहीहंडी सादरीकरण करत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी मार्गदर्शन करताना संजय नवले यांनी भगवान श्रीकृष्णाच्या जीवनातून धैर्य, कर्तव्यनिष्ठा, नेतृत्व, मैत्री आणि संकटांवर मात करण्याची प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. दहीहंडी उत्सव हा एकता, संघभावना आणि परस्पर सहकार्याचा संदेश देणारा असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणासोबतच भारतीय संस्कृती व परंपरांचे जतन करून त्या पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

पोलीस निरीक्षक विकास देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक करत भारतीय सण-उत्सवांमधून मिळणाऱ्या संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षणासोबत संस्कृती आणि परंपरांचे जतन करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, उपप्राचार्या निकहत शेख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साह, भक्तिभाव आणि आनंदाच्या वातावरणात दहीहंडी उत्सवाची सांगता झाली.

# सारथी संस्थेच्या इतिहासकार संशोधक तज्ज्ञ समितीवर शिवश्री गंगाधर बनबरे यांची निवड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांतर्गत कार्यरत असलेल्या सारथी संस्थेच्या इतिहासकार, संशोधक व तज्ज्ञ समितीच्या सदस्यपदी संभाजी ब्रिगेडचे राष्ट्रीय प्रवक्ते व मार्गदर्शक शिवश्री गंगाधर बनबरे सर यांची निवड करण्यात आली आहे.

इतिहास संशोधन, सामाजिक प्रबोधन तसेच विविध सामाजिक विषयांवरील अभ्यासपूर्ण मांडणीसाठी गंगाधर बनबरे यांनी सातत्याने योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाशी संबंधित सारथी संस्थेच्या महत्त्वपूर्ण समितीवर त्यांची निवड झाल्याने सोलापूरसह राज्यातील विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

सारथी संस्थेच्या माध्यमातून मराठा, कुणबी समाजातील विद्यार्थी, संशोधक व युवकांसाठी विविध शैक्षणिक, संशोधनात्मक आणि विकासाभिमुख उपक्रम राबविले जातात. या पार्श्वभूमीवर इतिहास व संशोधन क्षेत्राशी संबंधित तज्ज्ञ समितीमध्ये गंगाधर बनबरे यांचा समावेश होणे ही त्यांच्या कार्याची महत्त्वपूर्ण दखल मानली जात आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवर तसेच मित्रपरिवाराच्या वतीने शिवश्री गंगाधर बनबरे सर यांचे हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

# बीसीए व एमसीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत व परिचय कार्यक्रम संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विद्या विकास प्रतिष्ठान अभियांत्रिकी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी बीसीए व एमसीए प्रथम वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत व परिचय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नवोदित विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची ओळख करून देणे, शैक्षणिक व्यवस्था, विविध उपक्रम, सोयी सुविधा तसेच विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विविध संधींची माहिती देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर विद्यापीठ मधील कॉम्पुटर सायन्स अँड अप्लिकेशन्स चे विभागप्रमुख डॉ. एस. डी. राऊत, व्हाईस चेअरमन मधुकर कटकधोंड, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य व कॅम्पस संचालक डॉ. अरुण एन. गायकवाड, डॉ. पी. आर. देशमुख, प्रा. अविनाश पाटील, डॉ. एस. आर. आळंद, प्रा. संजय बुगडे, प्रा. प्रतिक्षा कटकधोंड आणि तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या वेळेस नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड सर यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचा परिचय करून दिला. यावेळी त्यांनी महाविद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रम, अभ्यासक्रम, नियम व शिस्त तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. व्हाईस चेअरमन मधुकर कटकधोंड सर यांनी विद्यार्थ्यार्चे मार्गदर्शन केले.

यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. एस. डी. राऊत यांनी 'डिजिटल लर्निंग आणि ई-कंटेंट' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनातून त्यांनी तंत्रज्ञानाधारित शिक्षणाचे महत्त्व, आधुनिक अध्यापन पद्धती आणि शिक्षण प्रक्रियेत डिजिटल संसाधनांचा प्रभावी वापर याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली.

यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्तेसोबतच कौशल्य विकास, तंत्रज्ञानाचे ज्ञान, व्यक्तिमत्त्व विकास तसेच विविध सहशैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आर. एल. कटाप, तर आभार प्रदर्शन प्रा. के. एल. चव्हाण यांनी केले. तसेच प्रा. एम. के. मुजावर यांनी प्रमुख पाहुणे यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन डॉ. एस. आर. आळंद यांनी केले. समन्वयक प्रा. जे. डी. पाटील, प्रा. एम. व्ही. सोनकवडे व प्रा. आर. सी. शिंदे आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष अमोल (नाना) चव्हाण, संस्थापक चेअरमन डॉ. जी. के. देशमुख तसेच व्हाईस चेअरमन मधुकर कटकधोंड यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

# सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात पॉक्सो कायद्याबाबत जनजागृती




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बालकांचे लैंगिक शोषण व अत्याचार रोखण्यासाठी केवळ कायदे असणे पुरेसे नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि समाजातील प्रत्येक घटकाची सजगता आवश्यक आहे. बालकांच्या सुरक्षिततेसाठी असलेल्या कायदेशीर तरतुदी, त्यांच्या अधिकारांची तसेच अत्याचाराच्या घटनांमध्ये घ्यावयाच्या योग्य भूमिकेची माहिती सर्वांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमात करण्यात आले.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या कॉमन मिनिमम प्रोग्रामअंतर्गत आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निदेशांनुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर आणि सिंहगड इन्स्टिट्यूट्स यांच्या संयुक्त विद्यमाने एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगाव येथे कायदेविषयक व सामाजिक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात Protection of Children from Sexual Offences Act, 2012 (POCSO) अर्थात पॉक्सो कायद्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बालकांवरील लैंगिक अत्याचाराचे विविध प्रकार, त्याची संभाव्य लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, बालकांना मिळणारे कायदेशीर संरक्षण, तक्रार व मदतीची प्रक्रिया तसेच अशा घटनांची माहिती मिळाल्यास जबाबदार नागरिक म्हणून कोणती पावले उचलावीत, याबाबत विद्यार्थ्यांना आणि उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

'Safeguarding Innocence: Overview of POCSO Act' या विषयावर ॲड. श्रेया सापटणेकर यांनी मार्गदर्शन केले. बालकांच्या संरक्षणासाठी पॉक्सो कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी, बालकांच्या हिताला दिलेले प्राधान्य आणि संवेदनशील प्रकरणांमध्ये कायदेशीर प्रक्रिया याविषयी त्यांनी माहिती दिली. विद्यार्थ्यांसोबतच प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

बालकांशी संबंधित लैंगिक अत्याचाराच्या घटना अनेकदा भीती, दबाव किंवा माहितीच्या अभावामुळे समोर येत नाहीत. त्यामुळे बालकांशी संवाद साधताना विश्वासाचे वातावरण निर्माण करणे, संशयास्पद बाबींकडे दुर्लक्ष न करणे आणि योग्य वेळी सक्षम यंत्रणेकडे माहिती देणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. 'बालकांचे संरक्षण ही केवळ पालकांची नव्हे, तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे,' हा संदेशही कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिंहगड इन्स्टिट्यूट्सचे कॅम्पस डायरेक्टर संजय एस. नवले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरचे सचिव तथा न्यायाधीश अमोलकुमार ए. देशपांडे यांच्या हस्ते कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास ॲड. बसवराज सलगर, ॲड. सुजय सापटणेकर, ॲड. श्रेया सापटणेकर तसेच सारथी यूथ फाउंडेशनचे संस्थापक सचिव रामचंद्र वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोलकुमार ए. देशपांडे यांचेही मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांनी संवादात्मक सत्रात उत्स्फूर्त सहभाग घेत पॉक्सो कायदा, बालकांचे संरक्षण, कायदेशीर मदत आणि सामाजिक जबाबदारी यासंदर्भात विविध प्रश्न विचारले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना मार्गदर्शनपर उत्तरे देत कायद्याची माहिती केवळ परीक्षेपुरती मर्यादित न ठेवता दैनंदिन जीवनातही त्याचा उपयोग करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. यशपाल खेडकर यांनी केले, तर प्रियंका गायकवाड यांनी आभारप्रदर्शन केले.

# श्रावण मासानिमित्त एम. के. फाउंडेशन संचालक मंडळ व महादेव कोगनुरे मित्र परिवाराची भक्तिमय दर्शन यात्रा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पवित्र श्रावण मासाचे औचित्य साधून एम. के. फाउंडेशन संचालक मंडळ तसेच महादेव कोगनुरे मित्र परिवाराच्या वतीने आपल्या सदस्यांसाठी विशेष भक्तिमय दर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेअंतर्गत श्री क्षेत्र औंढा नागनाथ ज्योतिर्लिंग तसेच नांदेड येथील पवित्र गुरुद्वारा येथे दर्शन घेण्यात येणार आहे.

श्रावण महिना हा भगवान महादेवाच्या आराधनेसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो. या पावन महिन्यात आपल्या परिवारातील सदस्यांना एकत्रितपणे धार्मिक स्थळांचे दर्शन घेता यावे, भक्तीमय वातावरणाचा अनुभव घेता यावा आणि आपापसातील स्नेह व बंधुभाव अधिक दृढ व्हावा, या उद्देशाने या विशेष यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

यात्रेदरम्यान श्री क्षेत्र औंढा नागनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन भगवान महादेवाचे आशीर्वाद घेतले जाणार आहेत. तसेच नांदेड येथील पवित्र गुरुद्वारा येथे भेट देऊन दर्शन घेण्यात येणार आहे. धार्मिक स्थळांच्या दर्शनासोबतच या यात्रेच्या माध्यमातून एम. के. फाउंडेशन संचालक मंडळ आणि महादेव कोगनुरे मित्र परिवारातील सदस्यांना एकत्र येण्याची, संवाद साधण्याची आणि स्नेहबंध अधिक दृढ करण्याची संधी मिळणार आहे.

एम. के. फाउंडेशन आणि महादेव कोगनुरे मित्र परिवार यांच्या माध्यमातून विविध सामाजिक व विधायक उपक्रम राबविले जात असून, त्याच भावनेतून या वर्षी पवित्र श्रावण मासानिमित्त ही भक्तिमय यात्रा आयोजित करण्यात आली आहे. धार्मिक आस्था, सामाजिक बांधिलकी आणि आपलेपणाची भावना जपत परिवारातील सदस्यांनी एकत्रितपणे हा आध्यात्मिक प्रवास करण्याचा संकल्प केला आहे.

या यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी एम. के. फाउंडेशन संचालक मंडळ, महादेव कोगनुरे मित्र परिवारातील पदाधिकारी व सदस्य नियोजनबद्ध पद्धतीने परिश्रम घेत आहेत. ही यात्रा केवळ दर्शनापुरती मर्यादित न राहता स्नेह, एकोपा, संस्कार आणि भक्तीचा संगम ठरणार आहे.

श्रावण मासाच्या पावन पर्वात आपल्या परिवारातील सदस्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या भक्तिमय यात्रेमुळे आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण होणार असून, 'हर हर महादेव!' आणि 'जय भोलेनाथ!' या जयघोषाने संपूर्ण यात्रा भक्तिमय होणार आहे.

# कोर्टी येथे प्रशांतराव परिचारक यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील कोर्टी येथे, विधान परिषद सदस्य प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी 4 सप्टेंबर रोजी कोर्टी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या पटांगण मध्ये वृक्षारोपण व शाळेतील सर्व मुला मुलींना वही पेन व खाऊ वाटप करण्यात आले, जनतेसाठी अहोरात्र झटणारे नेतृत्व म्हणजे प्रशांतराव परिचारक आहेत त्यांच्या वाढदिवस समाज उपयोगी व समाजातील दुर्बल घटकासाठी मदत झाली पाहिजे, होतकरू व गरीब विद्यार्थ्यांना, वही पेन खाऊ वाटप करण्यात आले, तसेच गावातील तरुण मुलांनी सामाजिक बांधिलकी जपत व हार फेटे व फटाक्याची अतिश बाजी न करता वृक्षारोपण व हासामाजिक उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपत, प्रशांतराव परिचारक मालकांचा वाढदिवस साजरा करण्यात आला

यावेळी पंचायत समितीचे सभापती शुभम आगवणे, स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक सहकारी साखर कारखान्यांचे संचालक भैरू माळी, मा, पंचायत समिती उपसभापती अरुण घोलप, मा, सरपंच रघु पवार ,उपसरपंच मुन्ना शेख, द्रोणाचार्य हाके, मा,संचालक गणपत लवटे शाळेचे मुख्याध्यापक बापू मिसाळ सर ग्रामपंचायत सदस्य राजू शेंबडे, सत्यवान मस्के, पोपटहाके मा,उपसरपंच दादा लवटे मा,उपसरपंच महेश येडगे राजाराम माळी, तात्यासो कारंडे राजू बाक्षर मुलानी, अमोल बनसोडे नाथा बाबर दत्ता ओव्हाळ तुकाराम बाबर सुरेश लवटे, दिनेश चव्हाण इत्यादी मान्यवर व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका विद्यार्थी विद्यार्थिनी व ग्रामस्थ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नारायण चिंचोलीत मा.आ.प्रशांतराव परिचारक यांचा वाढदिवस विविध विधायक उपक्रमांनी साजरा




**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** विधान परिषदेचे माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त गोकुळाष्टमीच्या निमित्ताने शुक्रवार, दि. ०४ सप्टेंबर २०२६ रोजी नारायण चिंचोली (ता. पंढरपूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्यने उपस्थिती लावून या विधायक उपक्रमातून माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांना शुभेच्छा दिल्या.या निमित्त आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिरातून ग्रामस्थांसाठी आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा शेकडो नागरिकांनी लाभ घेतला. समाज प्रबोधनः राष्ट्रीय भारूडकार चंदाताई तिवाडी यांच्या लोककला व समाज प्रबोधनपर कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. माता व बालकल्याणः कार्यक्रमादरम्यान गर्भवती महिलांना मायेची ओटीभरणी करण्यात आली तसेच नवजात बालकास बेबी कीटचे वाटप करण्यात आले.

महिला सन्मान व उपयोगी वस्तू वाटपः महिलांना संसार उपयोगी भांडी वाटप करण्यात आली, तसेच सर्व शासकीय महिलांचा साडीचोळी देऊन विशेष सन्मान करण्यात आला. गुणगौरवः विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा व स्पर्धा परीक्षांमधील गुणवंतांचा बक्षीस वितरण करून गौरव करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन कैलासराव खुळे (सर) यांनी भूषवले.तर कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूरचे सभापती हरिष गायकवाड हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच पंचायत समिती, पंढरपूरचे सभापती डॉ. शुभम आगावणे आणि कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संचालक मा. लक्ष्मण (तात्या) धनवडे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. या कार्यक्रमाचे आयोजन नारायण चिंचोली ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. नर्मदा लक्ष्मण धनवडे, उपसरपंच गहिनीनाथ चव्हाण, सर्व ग्रामपंचायत सदस्य, पांडुरंग परिवार, तसेच नारायण चिंचोली येथील पदाधिकारी व अधिकारी यांनी केले होते.यावेळी लक्ष्मण कोले, विष्णू माने, भास्कर गुंड, दत्तात्रय मस्के, माऊली मस्के, माऊली बरडे, धर्मराज नलावडे, लहू नलावडे,विजय कोळेकर शिवाजी भोसले, मुकुंद घाडगे, श्रीधर कोळेकर, बाळू बनसोडे, दत्ता बनसोडे, शिवाजी वसेकर, सतीश वसेकर,बापू कोळेकर, पोपट पाटील, पांडुरंग हराळे, दादा जानकर, बंडू मस्के, अण्णा डुबल, बाळू वसेकर, संदीप कोले, दत्तात्रय गुंड, सुरेश डुबल, हनुमंत सोनवर, मारुती चव्हाण, सहदेव कोले, बळवंत धनवडे, विजय कोळेकर, सौदागर गुंड, आप्पासाहेब वाघमोडे, नारायण गुंड, साधू नलवडे, वैजनाथ मस्के, तानाजी वसेकर, पप्पू कंदारे, भाऊसाहेब माने, सचिन घाडगे, सुनील माने, सचिन भडकवाड, विविध कल्याणकारी उपक्रमांमुळे आमदार प्रशांत परिचारक यांचा वाढदिवस यंदा नारायण चिंचोली येथे अतिशय उत्साही व सामाजिक वातावरणात पार पडला.